



# Engineering चा कॉलेज कट्टा

भाग्यश्री पाटील



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# ENGINEERING चा कॉलेज कट्टा

लेखिका : भाग्यश्री पाटील

# ENGINEERING चा कॉलेज कट्टा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ENGINEERING चा कॉलेज कट्टा

लेखिका भाग्यश्री शिवाजीराव पाटील

असिस्टंट प्रोफेसर, ई एण्ड टी सी डिपार्टमेंट

SMSMPITR, अकलूज

मोबाईल: ९०९६८११२७१

ई-मेल: bhagayshri1271@gmail.com

**ले औटींग तसेच मुखपृष्ठाचे डिझाइन: भाग्यश्री पाटील**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २९ नोव्हेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखिकेची ओळख



नमस्कार!

माझे नाव भाग्यश्री पाटील. मी व्यवसायाने एक इंजिनिअर असून अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिटयूट ऑफ  इंजिनीरिंग अँड रिसर्च मध्ये असिस्टंट प्रोफेसर या पदावर कार्यरत आहे.

माझी आधीची २ पुस्तके केवळ इसाहित्य मुळे असंख्य वाचकांपर्यंत पोचू शकली. मला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि प्रोत्साहनामुळेच आज हे तिसरे पुस्तक मी लिहू शकले. त्याबद्दल खरं तर आधी इसाहित्य चे मन:पूर्वक आभार.

आजकालच्या डिजिटल युगात मोबाइल ला अनन्यसाधारण महत्व आलेले आहे. इतके की त्याशिवाय कुठले  कामच होत नाही. याचाच परिणाम कॉलेज मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर देखील दिसून येत आहे. मोबाइलचा वाढता वापर, ऑनलाईन गेम्स खेळण्याचे वाढते प्रमाण यामुळे मुलं कॉलेज लाइफ जगायलाच विसरली आहेत. याचा परिणाम त्यांच्या अभ्यासावर देखील होत आहे. मुलांना अभ्यास आणि इतर गोष्टींमध्ये समतोल साधता यावा तसेच सर्व गोष्टींचे महत्व कळावे या हेतूने माझे स्वतःचे कॉलेज चे अनुभव मी या पुस्तकाच्या निमित्ताने मांडत आहे. हे पुस्तक सुद्धा माझ्या मागील २ पुस्तकांप्रमाणे वाचकांना नक्की आवडेल असा मला विश्वास आहे. हे लेखन सर्वांना एक नवीन दिशा देईल तसेच पुस्तकाला मिळणार प्रतिसाद माझ्यातल्या लेखिकेला अजून नवीन आणि सुंदर लेखन करण्यास प्रवृत्त करेल हीच आशा.

**प्रोफेसर भाग्यश्री पाटील**

अकलूज

**संपर्क :**


भाग्यश्री शिवाजीराव पाटील


असिस्टंट प्रोफेसर, ई एण्ड टी सी डिपार्टमेंट

SMSMPITR, अकलूज

मोबाईल: ९०९६८११२७१

ई-मेल: bhagayshri1271@gmail.com




भाग्यश्री पाटील यांची ई साहित्यतर्फे प्रकाशित झालेले हे तिसरे पुस्तक. यापुर्वीची त्यांची दोन्ही पुस्तके सामाजिक विषयांवरील होती. त्यांना वाचकांकडून अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. किसान आणि जवान यांच्याबद्दल अत्यंत तळमळीने लिहीलेल्या या दोन पुस्तकांनंतर देशाचे भविष्य घदवणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे हे तिसरे पुस्तक वाचकांना नक्की आवडेल.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/anndatasb_bhagyashri_patil.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/14_02_shouryakatha_bhagyashree_patil.pdf

# ENGINEERING चा कॉलेज कट्टा

भाग्यश्री पाटील

# मनोगत

नमस्कार मित्र मैत्रिणींनो ! 😊

मित्र मैत्रिणींनो या अर्थाने म्हणाले की, या पुस्तकाचा प्रवास जर आपल्याला अनुभवायचा असेल तर एकमेकांशी मैत्री असणे खुप गरजेचे आहे. मैत्री करायला वयाचे बंधन नसते. तसेच क्षेत्राचेही बंधन नसते. त्यातल्या त्यात कॉलेज लाइफ मधली मैत्री जरा जास्तच खास असते.

कॉलेज म्हटलं की डोळ्यांसमोर येतं ते मोठं कॅम्पस. त्यात उत्साहाने, आनंदाने बागडणाऱ्या मुलामुलींचे ग्रुप, धमाल, मस्ती, लेक्चर्स, कॅन्टीन, मित्रमैत्रिणी आणि बरंच काही. या आठवणी इतक्या खास असतात की आयुष्यभरासाठी मनाच्या कप्प्यात साठवल्या जातात आणि आठवतील तेव्हा मनाला चैतन्य आणि उत्साह देऊन जातात.

पण आजकालची पिढी मोबाईल या एकाच मित्रामध्ये इतकी गुंतली आहे की हे अनमोल दिवस जगायचे सोडून ती त्याच मित्रात आपलं विश्व सामावून घेतेय. कुणाचा वाढदिवस असला, दे ऑनलाइन शुभेच्छा, कोणता सणवार असला, कर मॅसेज फॉरवर्ड, कोण आजारी असले, दे पाठवून गेट वेल सून चे मॅसेज, कुणाचं लग्न असलं, दे पत्रिका ऑनलाईन पाठवून. तो मित्र इतका प्रिय झालाय की त्याच्यापासून लांब राहवत नाही. त्यासाठीच कॉलेजचं आयुष्य किती मस्त आणि सुरेख असतं आणि ते मुलांनी एन्जॉय करावं तेही मोबाइल सोडून बाकीच्या मित्रांसोबत! ही जाणीव करून देण्याच्या हेतूने निर्माण झालेले हे पुस्तक!

जास्त गंभीर होऊ नका! मला माहिती आहे हे पुस्तक वाचल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला आपली कॉलेज लाइफ एन्जॉय करावीशी वाटेल आणि ज्यांनी केली आहे त्यांना त्यांचे ते दिवस परत अनुभवायला मिळतील.

या पुस्तकात कसलेही तत्वज्ञान नाही आणि उपदेश सुद्धा नाही. आहे ते फक्त कॉलेज चे छानसे आयुष्य. तसं पाहिलं तर मी कॉलेज मध्ये असताना खूप काही शिकले खूप धमाल केली आणि अजूनही ते दिवस आठवून छानच वाटतं. चला तर मग तयार आहात ना ? एक नवीन प्रवास अनुभवायला! एक नव्या कॉलेजच्या विश्वात वावरायला! मजा मस्ती करायला!

# अनुक्रमणिका

१. कॉलेजचा पहिला दिवस १
२. कॅन्टीन ५
३. हॉस्टेल ७
४. Submission आणि PL ९
५. Exams आणि Results १२
६. Gathering (Cultural Events) १६
७. Industrial Visit २०
८. Extra-Curricular Activities २३
९. अभ्यास आणि Career २७
१०. निरोप समारंभ (Farewell) ३०

# १. कॉलेज चा पहिला दिवस

**“May I come in sir?”**

लेक्चर चालु असतं. चालु होऊन १०-१५ मिनिटे झालेली. तेवढ्यात एक मुलगी येते आणि विचारते **“May I come in sir?”**. सर तिला आत येऊन बसायला सांगतात. ती आत येऊन बाकावर बसते. ती दरवाजामधून आत येऊन बसेपर्यंत सगळंच सगळ्यांना नॉर्मल वाटत असतं, पण एका मुलाला ते विशेष वाटतं, कारण पहिल्याच नजरेत ती त्याला आवडलेली असते. थोडक्यात ती त्याचा **Crush** झालेली असते. हा झाला **TV**, चित्रपटातला कॉलेज चा पहिला दिवस !

कॉलेजचा पहिला दिवस आपण जसं ठरवतो किंवा TV मध्ये बघतो तसं कधीच घडत नाही. इंजिनीअरिंगमध्ये तर नाहीच नाही. घरून कॉलेजला जायचं असेल तर आई उठवण्यापासून ते डबा भरून हातात देईपर्यंत सगळं आवरून देत असते. पण होस्टेलला असेल तर पहिला दिवस खूपच गमतीशीर असतो. एकतर कधी नव्हे ते एकटं राहावं लागलेलं असतं. आदल्या दिवशी घरचे लोक सोडून जाताना डोळ्यात पाणी असतं. मग ते दूरवर जाईपर्यंत डोळ्यातल्या गंगा जमुना काय थांबायचं नाव घेत नाहीत. मग हॉस्टेलमध्ये नवीन रूम, नवीन रूममेट्स, नवीन जागा. एका दिवसात सगळं गळी उतरवणं जरासं कठीणच! नवीन ठिकाणी लवकर नीट झोपही लागत नाही. कशीतरी लागलीच तर जागही येत नाही. आईने उठवायची सवय लागलेली असते ना. मग सकाळी उठल्यावर समजतं की अंघोळीसाठी लाईनला उभं राहावं लागतं. मग कसंतरी आवरून गेलं तर भूक लागलेली असते. कॅन्टीनला खावं म्हणलं तर लेक्चरला उशीर झालेला. मग तसंच जावं लागतं. अशा वेळी घराची, आईची खूप आठवण येते.

क्लास मध्ये गेल्यावर सगळं नवीन असायचं. नवीन मित्रमैत्रिणी, नवीन टीचर्स, नवीन सिलॅबस. विशेष म्हणजे सगळ्याच प्रकारची मुलंमुली क्लास मध्ये असत. कुणी छान गाणं म्हणायचं, कुणी छान पेंटिंग करायचं, कुणी अभ्यासात हुशार तर कुणी खेळात. आमच्या कॉलेजमध्ये काही मुलंमुली बसने तर काही स्वतःच्या बाईकवर येत असायची. त्यात ज्या मुलांकडे गाडी असायची ते असे काही लुक्स द्यायचे जसं काही अक्ख्या जगात त्यांच्याकडंच गाडी आहे. काही मुलं इम्प्रेशन मारण्यासाठी उगाचच

गाडीवरून इकडून तिकडं फिर, कुणी खूपच अभ्यासू असल्यासारखं दाखव, कुणी नवीन कपडे घालून ये असे उद्योग करत. 😂

मला अजूनही माझ्या कॉलेज चा पहिला दिवस आठवतो. आमच्या गावी १२ वी पर्यंत शिक्षण होतं त्यामुळे ग्रॅज्युएशन साठी सोलापूरला जावं लागलं. ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजि, सोलापूर हे आमचे कॉलेज चे नाव. कॉलेज सुरु होणार होतं त्याच्या आदल्या दिवशी वडील हॉस्टेल ला सोडून गेले. मी आधी वर्णन केले त्याप्रमाणे आमचेही अश्रू सुरु झाले. आता आठवलं की हसू येतं. फोनवर आई बाबांचा नुसता आवाज ऐकला तरी रडू कोसळायचे. हॉस्टेल कॉलेजपासून थोडंसं दूर असल्यामुळे कॉलेज ला जाण्यासाठी बस ची सुविधा होती. रोज सकाळी ८ वाजता कॉलेज बस आमच्या स्टॉप वर येऊन आम्हाला घेऊन जाई. मग ९ वाजेपर्यंत बस कॉलेज ला पोचायची. 😊

पहिल्या दिवशी आवरून स्टॉप वर थांबलो. बस आली आणि बस मध्ये बसलो. खूप टेन्शन आलं होतं. कॉलेज कसं असेल? आपल्याला करमेल का? हे सगळे विचार मनात गर्दी करत होते. बस जात जात इतर स्टॉप वरील विद्यार्थ्यांनाही घेत जात होती. नवीन असल्यामुळे चढणारे इतर विद्यार्थीही माझ्यासारखेच हजारो प्रश्न मनात घेऊन बसमध्ये चढत होते. एकदाचा प्रवास संपला आणि कॉलेज आलं. ऍडमिशन च्या वेळी कॉलेज पाहिलेले असल्यामुळे थोडंसं ओळखीचं झालं होतं एव्हाना. युनिफॉर्म मधली मुलंमुली, सगळे शिक्षक, सगळंच नवीन होतं. त्यावेळी स्मार्ट फोन्स क्वचितच कुणाकडेतरी दिसायचे. त्यामुळे फोन घेऊन बसण्याचा प्रश्नच नव्हता. क्लास मध्ये हळू हळू लेक्चर्स ला सुरवात झाली. नवीन विषय थोडेसे अवघड वाटतं होते पण पहिला दिवस असल्यामुळे फक्त ऐकून घेत होतो सगळे. 😊

मग दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत सगळे ग्रुप्स करून एकत्र बेंचवर डबे मांडून जेवलो. त्यामुळे व्हरायटी असलेलं जेवण तर मिळालंच पण नवीन मैत्रिणी झाल्या. ओळखी झाल्या. प्रथम वर्ष असल्यामुळे सगळ्या ब्रॅंचेस एकत्र होत्या. कुणी इ अँड टी सी, कुणी सिव्हील, कुणी मेकॅनिकल, कुणी इलेक्ट्रिकल, कुणी कॉम्प्युटर. छान वाटलं सगळ्यांच्या ओळखी झाल्या तेव्हा. पण एक होतं की सगळे खूपच शांतपणे वागत बोलत होते. ठराविकच मुलं ज्यांचं १२ वी पर्यंतच शिक्षण तिथंच झालंय असे थोडी दंगामस्ती करत होते. नंतर लक्षात आलं की पहिला दिवस असल्यामुळे सगळे इतकं शांतिपूर्वक वागत होते. 😊

त्यातच दुपारून आमच्या बॅच चं कम्युनिकेशन स्किल चं लेक्चर होतं. मॅडम जरा स्ट्रिक्टच वाटत होत्या. खूप टेन्शन आलेलं. मॅडम आल्या आणि सांगितलं, “प्रत्येकाने समोर येऊन इंग्लिश मध्ये स्वतःच

इंट्रोडक्शन द्या" . झालं. आले सगळे टेन्शन मध्ये. काही मोजकी मुलं, ज्यांचं इंग्लिश मेडीयम मध्ये शिक्षण झालेलं त्यांनी केली सुरुवात फाड फाड इंग्लिश मध्ये बोलायला. मग तर आमची हालत सांगायलाच नको. अशा वेळी असं वाटत असतं की लेक्चर लवकर संपावं, पण वेळ सुद्धा तेव्हा आपल्यावर रुसलेली असते. १ मिनिट एक तासासारखा जातो आणि शेवटी वेळ येतेच. तो समोर जाऊन इंग्लिश बोलण्याचा पहिला अनुभव. शाळेत कितीतरी वेळा ५०० ते १००० मुलामुलींसमोर वक्तृत्व स्पर्धेत भाषण करून बक्षीस मिळवणारी मी १५-२० मुलामुलींसमोर इंग्लिश बोलताना पूर्ण घाबरून गेले. मग कसंतरी मोडकं तोडकं इंग्लिश वापरून सांगून टाकलं आणि पटकन जागेवर जाऊन बसले. उभी राहिल्यापासून बसल्यानंतर पण किती तरी वेळ थर थर कापत होते.😥 हसू पण येतं होतं. बसलेल्यांपैकी सगळ्यांची हालत थोड्या फार फरकाने सारखीच होती. बोलता येतं नाही किंवा सुचत नाही असं काहीच नव्हतं पण आपलं काहीतरी चुकेल, आपल्याला सगळे हसतील या भीतीने सगळ्यांचं असं झालं होतं. तेव्हाच समजलं की अजून आपल्याला खूप काही शिकायचं आहे.😊

हा ही प्रसंग खूप जणांनी अनुभवला असेल. त्यात वाईट किंवा वेगळं वाटून घेण्यासारखं काहीच नाही, कारण कोणतीही नवीन गोष्ट शिकताना अडचणी येतातच. मी त्यावेळी स्वप्नातही विचार केला नव्हता की समोर येऊन इंग्लिश मध्ये ४ वाक्यपण बोलू न शकणारी मी आज इंग्लिश मध्ये कित्येक विद्यार्थ्यांना लेक्चर देईन.😎

खरं म्हणजे असे गमतीदार अनुभव जोपर्यंत येत नाहीत तोपर्यंत आपल्याला आपल्या उणिवा समजत नाहीत. मी तर इतकी नशीबवान आहे की मला ज्ञान घेणे आणि ज्ञान देणे या दोन्ही गोष्टी अनुभवायला मिळाल्या आणि मिळत आहेत. माझे अनुभव सांगताना मीही अजून कॉलेज मध्ये शिकतेय आणि ते सोनेरी दिवस अनुभवतेय असंच मला वाटतंय. हा प्रवास फक्त माझाच नाही तर विद्यार्थिदशेतल्या प्रत्येकाचा आहे. अनुभव कदाचित याहून थोडे वेगळे असतील पण भावना मात्र त्याच! 😊

बहुतेक जणांचा पहिला दिवस असाच असेल किंवा किंचित वेगळा पण नावीन्य तेच असतं. ते नावीन्य आज कुठंतरी लुप्त होताना दिसत आहे. या सोनेरी क्षणांना मुलं मुकत चालली आहेत असं वाटत आहे. मुलांचा पहिला दिवस जातो पण मोबाइल मध्ये. मुलांना मित्रमैत्रिणी असतात पण बोलणं ऑनलाईन. मुलं खेळ खेळतात पण पब-जी. बाहेर खाण्याच्या सवयीमुळे आईच्या हातच्या टिफिन ची चव कुठेतरी हरवल्यासारखी वाटते. तसेच एकत्र टिफिन खाण्याची मजा, एकमेकांना चिडवण्यातली मजा, गप्पा गोष्टी

ही मजा ही हरवल्यासारखी वाटते. हा वेळ आता फोन ने घेतला आहे. याच गोष्टींची जाणीव मुलांना व्हावी म्हणून हे अनुभव सांगत आहे.

तर असा हा अविस्मरणीय कॉलेज चा पहिला दिवस सर्वांनाच आपल्या विद्यार्थीदशेतल्या पहिल्या दिवसाची नक्कीच आठवण करून देईल. 😊



१.आमचं कॉलेज 😊

************************************************************

# २. कॅन्टीन

कॉलेज मध्ये सर्वात हक्काची आणि आवडीची जागा म्हणजे कॅन्टीन. मग कुणाचं सेलिब्रेशन असो किंवा सहज घेतलेला चहा. त्यात एक वेगळीच मजा असायची. सहज चहासाठी म्हणून गेलं तरी तासंतास गप्पा रंगायच्या. कुणाला तरी चिडवणं, कुणाची नोट्स ची देवाणघेवाण, कुणाच्या गप्पा. विविध विषयांवर चर्चासत्रच भरवायचो आम्ही. आणि चर्चा पण इतक्या मजेशीर असायच्या की हसून हसून पोट दुखायचं. कुणाची नक्कल कर, कुणी जास्ती अभ्यास करत म्हणून त्याला उगाचच चिडव, मजा असायची. 🤗

कॉलेज च्या समोरच एक वडापाव सेंटर होते. त्याची गोष्ट तर वेगळीच. वडापाव सोबत चहापण असायचा. आम्ही प्रथम वर्षात असताना ते सेंटर नुकतंच चालु झालं होतं आणि केवढं आश्चर्य! आम्ही शेवटच्या वर्षाला जाईपर्यंत त्या छोट्याश्या टपरीचं रूपांतर चक्क छान हॉटेल मध्ये झालं होतं. असं वाटायचं जणू काही आमच्यासोबत तोही करिअर चे धडे गिरवतोय. 😊

हा तर थोडंसं विषयांतर झालं. कुठं होतो आपण? कॅन्टीन. तर या कॅन्टीन मधेच आमचं अर्ध विश्व सामावलेलं असायचं. सकाळी चहा नाश्ता, दुपारी जेवण, संध्याकाळी चहा नाश्ता, बर्थडे सेलिब्रेशन तर सर्रास कॅन्टीन मधेच व्हायचे. कारण तीच एकमेव अशी जागा असायची जिथे बिनधास्त कुणाचेही दडपण नसताना मजा करता येतं असायची. कॅन्टीन फक्त लेक्चर्स चालु असायचे तेवढंच शांत असायचं. नाहीतर इतर वेळी पूर्ण मुलामुलींनी गजबजलेलं. पाय ठेवायला पण जागा नसायची. नुसतं आत पाऊल ठेवलं तरी गर्दी, गोंधळ, कुणी ऑर्डर देण्यासाठी, कुणी बिल देण्यासाठी काउंटर वरती गर्दी केलेली असायची तर कुठे सगळे टेबल फुल आहेत बसायला जागा नाही म्हणुन मुलं उभी राहूनच खायला चालु करायची. विशेष म्हणजे तिथे तेव्हा कसलाही राग, अहंकार, कमीपणा, हेवेदावे, द्वेष, असल्या कशालाच जागा नव्हती. होती ती फक्त निखळ मैत्री आणि त्यातले निरागस रुसवेफुगवे, अपेक्षा इतकंच.😊

कधी कधी तर एखाद्याला त्रास द्यायचाच असं ठरवलं की, त्याला सगळ्यांनी मिळून गोड बोलून कॅन्टीन ला घेऊन जाणे आणि भरमसाठ ऑर्डर करून पोट भरून खाऊन चक्क निघून येणे आणि जाताना बिल तो देईल असे सांगून जाणे. हा कार्यक्रम तर ठरलेलाच. मग तो बिचारा गुपचूप बिल देऊन निघून येई. त्यावेळी त्याला किती राग येत असेल याची कल्पनाच न केलेली बरी.😂 पण राग येऊन तरी काय उपयोग? पैसे तर गेलेले असायचे. कॅन्टीन शी आमच्या असंख्य आठवणी निगडित आहेत. सर्वांच्याच

असतात. कॅन्टीन मध्ये साजरे केलेले वाढदिवस, फ्रेंड्स च्या पार्ट्या, रोजच्या गप्पा, गोंधळ, कायम लक्षात राहतो. कधी कधी मेस चे जेवण आवडले नाही की कॅन्टीनच तारणहार असायचे. कधी एकदा लेक्चर्स संपतात आणि कॅन्टीन ला जातो असं व्हायचं आम्हाला. 🤗



२. कॅन्टीन ची कॉफी

***********************************************************

# ३. हॉस्टेल

कॉलेज चा विषय निघावा आणि त्यात हॉस्टेल चा उल्लेख होणार नाही असं कधीच होणार नाही कारण जितक्या आठवणी कॉलेजच्या असतात त्यापेक्षा कितीतरी जास्त आठवणी हॉस्टेलच्या असतात. त्यामुळे त्या आठवणी म्हणजे न संपणारा खजिनाच असतो. शब्दांच्या बंधनात बांधून संपवणे अशक्य! त्यामुळे सुरुवात नक्की कुठून करायची आणि किती किती आणि काय काय सांगावे हा प्रश्नच आहे. तरी जमेल तसं माझ्या शब्दात मांडण्याचा मी प्रयत्न करेन.😊

हॉस्टेल मध्ये राहायला सुरु केल्यावर सुरुवातीचे काही दिवस खूपच एकटं वाटत असतं कारण घरापासून, आपल्या माणसांपासून लांब आहे याचं खूपच दुःख होत असतं. सारखी घराची आठवण येत असायची. पण मग एक हळू हळू ओळखी झाल्या आणि मग थोडंसं करमायला लागलं. 😊

हॉस्टेलमधला आमच्या आवडीचा कार्यक्रम म्हणजे बर्थडे सेलिब्रेशन्स! कुणाचाही बर्थडे असेल तर गुपचूप केक आणून ठेवणे, ग्रीटिंग्स बनवणे, रूम डेकोरेट करणे हे काम चालायचे, आणि हे इतकं बेमालूमपणे चालायचं की जिचा बर्थडे आहे त्या मैत्रिणीला कळूही द्यायचो नाही. त्यात पण वेगळीच मजा असायची. मग १२ वाजता तिला अचानक सरप्राईझ दिले जाई. 🤗 मग छान केक कापून खाऊन फोटो काढून १,२ वाजेपर्यंत गप्पा आणि त्यानंतर फोटो कसे आले आहेत ते बघण्यातच वेळ जायचा. अशी धमाल प्रत्येक वर्षी असायची. मग सकाळी उठून कॉलेज ला जाणे, ते संपलं की पार्टीचे नियोजन असायचे. पार्टी म्हटलं की सगळ्यांना खूप आनंद व्हायचा कारण मेसच्या जेवणापासून एक दिवसापुरती का होईना सुटका व्हायची. तसेच ज्याचा बर्थडे आहे त्याच्याकडून खूप मोठी ट्रीट घेता येत असायची. 😃

आणखी एक कार्यक्रम म्हणजे गप्पांचा आणि त्यासोबत चिवडा खाण्याचा! संध्याकाळी अभ्यास करून बोर झालं कि चिवडा काढून खायला बसायचो. त्यासोबत गप्पा इतक्या रंगायचा की वेळ काळ काही कळत नसायचं! होस्टेलला सगळेच ब्रँचेस चे एकत्र असल्यामुळे प्रत्येकजण आज क्लास मध्ये काय झाले ते रंगवून सांगायचा. क्लास मधल्या गमतीजमती ऐकत कसा वेळ जायचा कळायचे सुद्धा नाही. जोपर्यंत रेक्टर येऊन झोपा म्हणून रागवत नाहीत तोपर्यंत हा कार्यक्रम चालायचा. मग मनात नसताना चर्चा अर्धवट ठेऊन झोपावं लागायचं. सकाळी परत कॉलेज पण असायचं त्यामुळे झोपायचो. पण उरलेलं मात्र पुढच्या दिवशी पूर्ण करायचो. 😉

रंगपंचमी, कोजागिरी हे सण खूप उत्साहाने साजरे करायचो. रंगपंचमीला कंटाळा येईपर्यंत एकमेकांना रंगवायचो. उठल्यापासून ते दुपारपर्यंत हा कार्यक्रम चालायचा आणि दुपार ते संध्याकाळ रंग काढण्यात जायची. मग दुसऱ्या दिवशी सगळे रंगवलेले चेहेरे घेऊन कॉलेजला आलेले असायचे. कमीत कमी आठवडाभर तरी मूळ रंग परत येत नसायचा. सगळे वेगळेच दिसायचे. त्यातल्या त्यात होस्टेलवरचे तर जरा जास्तच वेगळे. याप्रमाणेच कोजागिरीही मस्त एन्जॉय करायचो. संध्याकाळी दूध आणि काही स्नॅक्स आणून ठेवायचो मग १२ वाजेपर्यंत गप्पा, गाण्यांच्या भेंड्या, जोक्स असे खेळ खेळायचे आणि १२ वाजले की खाऊन दूध पिऊन झोपायचो. 🤗



ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी फ्रेंडशिप डे असतो. त्याच्या आदल्या दिवशीच सगळ्यांचे फ्रेंडशिप बँड तयार असायचे. कोण किती जवळचे फ्रेंड आहे यावरून फ्रेंडशिप बँड ची व्हरायटी ठरायची.  मग पुढचे १,२ दिवस दिसेल त्याचा हात फ्रेंडशिप बँड्स नि भरलेला असायचा.

रिझल्ट्स लागायचे त्यावेळी खूप गंभीर वातावरण असायचे. प्रथम वर्षाला असताना तर जास्तच! एखाद्या वेळी रिझल्ट खराब लागला, किंवा काही अडचण आली तर सगळेच एकेमेकांना मानसिक आधार देण्याचे, प्रोत्साहन देण्याचे काम करायचे. यातूनच मैत्रीला सुरवात व्हायची. मैत्री समजायची. एकमेकांना अडचणी समजून त्या सोडवेपर्यंत सगळे साथ द्यायचे. चेष्टा, मस्करी, आनंद, दुःख सगळ्यांचाच शेरिंग असायचं. विशेष म्हणजे सोबत राहत असल्यामुळे प्रत्येकाचे गुणदोष प्रत्येकाला चांगलेच माहिती असायचे. निखळ मैत्री असल्यामुळे त्यात द्वेष, तिरस्कार, स्वार्थ या भावनांना थारा नसायचा. कुणी चुकत असेल तर हक्काने समजूत काढली जायची. योग्य मार्ग दाखवला जायचा. एकमेकांवर हक्काने रागवायचो आणि तितक्याच प्रेमाने समोरचे समजूतही काढायचे. कधी घरून डबा आला तर कधीच एकटं खाल्ल्याचे आठवत नाही. सगळे मिळूनच तो फस्त करायचो. अभ्यासात एकमेकांना मदत करायचो. एकी असायची. कधी २ मैत्रिणीचे भांडण झालेच तर सगळे मिळून त्यांना समजावून त्यांची परत मैत्री करून द्यायचे. या आणि अशाच असंख्य आठवणी आहेत. हे असे सुंदर आयुष्य प्रत्येकाने एकदातरी अनुभवावे. 😊

**********************************************************

## ४. Submission आणि PL

**Submission** ची तर गोष्टच निराळी. पुर्ण सेमेस्टर दंगा मस्ती करण्यात जायचं आणि अचानक **Submission** च्या डेट्स येऊन धडकायच्या. केल्याशिवाय तर पर्याय नसायचा. वर्गातली थोडीशीच काही अभ्यासु मुले सगळं वेळेत पुर्ण करायची आणि मग बाकीचे ज्यांनी केलं नाही ते या मुलांचं कॉपी करायचे. त्यातच इंजिनीअर्स साठी एक शायरी डेव्हलप व्हायची.

**“किनारे के सुकून से हमें ऐतराज तो नहीं, लेकिन तुफान मे कश्ती निकालने का मजा ही कुछ और है.”** 😃

बाकी हे फक्त बोलण्यापुरतं होतं. खरी मजा ओरल्स ला यायची. **Submission** टाइम मध्ये इतकी मजा असायची की विचारायलाच नको. ते वातावरणच वेगळं असायचं. कोण कुठे आहे पत्ताच लागत नसायचा. क्लास मध्ये तर अक्षरशः एकमेकांचे जर्नल्स हिसकावून घेऊन लिखाण चालु असायचे. ती गडबड, तो गोंधळ बघण्यासारखा असायचा. आधीच इतकं लिखाण असायचं आणि त्यात जर्नल च्या देवाण घेवाणी मध्ये एखाद पान हरवलं तर ते वेळेवर कधीच सापडायचं नाहीं आणि सापडलंच तर सगळं डबल लिहून झाल्यावर सापडायचं.😂 मग खुप वाईट वाटायचं. हे खूप वेळा झालं माझ्यासोबत. जर्नल आणि **Assignments** ज्यांच्या आधी पुर्ण व्हायच्या ते दुसऱ्यांना लिहायला द्यायचे. या सगळ्यात **Height** म्हणजे ज्यांनी मागून लिहून सगळं पुर्ण केलंय ते आधी पुर्ण करणाऱ्यांच्या आधी सगळं शिक्षकांकडून चेक करून घेऊन रिकामे! आणि ज्यांनी आधी पुर्ण केलंय त्यांची **Assignments,** जर्नल अजून क्लासमध्येच फिरत असत, आणि मग शेवटी आधी पुर्ण करणारे चेक करायला गेले की शिक्षकांना हे त्या मुलांनी दुसऱ्याचं कॉपी करून लिहून आणलं आहे अशी शंका यायची. 😂

उशिरा **Submission** केल्यामुळे कित्येकदा शिक्षकांची बोलणीही खावी लागायची, पण आम्ही कधीच त्यांचा राग राग केला नाही, कारण ते आमच्या चांगल्यासाठीच असायचं. ते कितीही रागवले, आमच्यावर ओरडले तरीही आम्ही शांतपणे खाली मान घालून ऐकत असु. **Assignments,** जर्नल्स वेळेत पुर्ण करण्याचा फायदा त्यावेळी कळत नसायचा, पण जेव्हा बऱ्याचदा **Assignment** मधले प्रश्न जशेच्या तसे पेपर मध्ये दिसायचे किंवा ओरल्स मध्ये विचारले जायचे तेव्हा कुठे डोक्यात प्रकाश पडायचा! पण तेव्हा वेळ निघून गेलेली असायची, आणि कमी मार्क्स पडायचे. मग पुढच्या सेमेस्टर पासून सगळं

सिरिअसली घ्यायला चालु केलं सगळं वेळेत पुर्ण करायला चालु केलं, आणि त्याचा फायदाही दिसून आला. ओरल्स चांगले जात आणि पेपर मध्ये मार्क्स पण चांगले पडू लागले आणि मग शेवटच्या वर्षापर्यंत हीच पद्धत कायम राहिली.😊

सेमिस्टर मध्ये अधूनमधून **UT** आणि **Syllabus** संपल्यावर **Preliminary Exams** असायच्या. त्याची तर गोष्टच निराळी. **Test** पेपर लिहिताना कधी कधी दिलेला २ पानांचा पेपर लिहायला पुरत नसे. मग **Supplement** घ्यावी लागायची. **Suppliment** घेऊन पेपर लिहिणारे ठराविकच लोक असायचे. सगळे घेत नसत. कुणाला पेपर तेवढ्यात कव्हर व्हायचा तर कुणाला सगळ्या प्रश्नांची उत्तर येत नसल्यामुळे पेपर कोरा राहत असे. अशा वेळी एखादा **Suppliment** घ्यायला उठला की सगळे त्याला चिडवण्यासाठी असे काही लुक्स देत की त्याला पुरवणी घेऊ की नको हेच समजत नसे. मग त्यानंतर जो कोणी **Suppliment** घायला उठेल त्याची हीच गत व्हायची, आणि पेपर संपल्यावर मग कॅन्टीन मध्ये बसलं की सगळे “खूप अभ्यास केला दिसतोय” म्हणून चिडवत.😃 पण ते चिडवणं फक्त मजा म्हणून असायचं. त्यात कसलाही तिरस्कार नसायचा किंवा कुत्सित भावनाही नव्हती.

कसंतरी **Submission** संपलं की लगेच ओरल्स यायच्या. त्यावेळी कंसेप्ट्स म्हणावे इतके क्लिअर नसायचे. मग काय, चार चार वेळा रिपीट ओरल द्यावी लागायची. जोपर्यंत **Examiner** चं समाधान होतं नाही तोपर्यंत ओरल द्यायची. त्यात **External Examiner** असे काही फिरवून प्रश्न विचारायचे की जे येत असतं तेसुद्धा विसरून जायचं आणि मग पुर्ण गोंधळ उडायचा. असं कधीच झालं नाही की एकदा जाऊन ओरल संपली. हा काळ गंभीर पण तितकाच आणि मजेशीर पण तितकाच.

मला अजूनही ते क्षण आठवतात जेव्हा ओरल किंवा **Submission** ला एखादा मुलगा किंवा मुलगी गंभीर चेहेऱ्याने गेले की बाकीचे पण गंभीर चेहरा करून अभ्यासाला लागायचे. मग तो मुलगा किंवा मुलगी ओरल देऊन आले की त्यांना गराडा घालायचे. सगळ्यांना हेच जाणून घेण्याची घाई असायची की काय प्रश्न विचारले. मग त्यांनी प्रश्न सांगताच उरलेले विद्यार्थी परत त्याच प्रश्नांचा गंभीरपणे अभ्यास चालू करायचे. पण गंमत अशी व्हायची की नंतर जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षक वेगळेच प्रश्न विचारायचे, आणि मग त्यांचा चांगलाच हिरमोड व्हायचा आणि परत अभ्यास करून जावे लागायचे. काही मुलं तर फारच गमतीशीर! आतमध्ये ओरल ला गेल्यावर त्यांना भलेही एकही प्रश्नाचे उत्तर नका का आले असेना, त्यांना

शिक्षकांची बोलणी खावी लागलेली असली तरी ते अशा काय थाटात बाहेर पडायचे जसे काय युद्ध जिंकून आले आहेत. 😃 मुली जितक्या गंभीर असायच्या तितकी मुलं नसत. मुलींना एका जरी प्रश्नाचे उत्तर देता आले नाही किंवा परत अभ्यास करून या असे थोडेसे जरी रागावलेल्या स्वरात बोलले तरी त्यांच्या डोळ्यातून गंगा जमुना चालू व्हायच्या.



४. सबमिशन

मुलं अगदी याउलट. एकही प्रश्नाचे उत्तर देता आले नाही तरी परत अभ्यास करून जायची आणि ओरल देऊन यायची. एकदाच्या ओरल संपल्या की सगळे सुटकेचा निःश्वास टाकत.

ओरल झाल्या की **PL** असायची. जेमतेम २० ते २५ दिवस असेल. या दिवसात सर्व विषयांचे अभ्यासाचे वेळापत्रक बनवणे, त्याप्रमाणे अभ्यास करणे आणि रिविजन करणे या सर्व गोष्टी चालायच्या. इतर वेळी मजा मस्ती करणारे **PL** मध्ये हातात पुस्तकांशिवाय कधी दिसायचेच नाहीत. सतत पुस्तके, नोट्स, लायब्ररी. दिवसापेक्षा संध्याकाळी अभ्यास छान व्हायचा. 😊

अभ्यास करून बोअर झालं की टी ब्रेक घ्यायचो. एकंदरीत वातावरण जरा जास्तच गंभीर असायचं. जिकडे बघेल तिकडे सगळे पुस्तक घेऊन बसलेले दिसायचे. कुणी एकटं तर कुणी ग्रुप स्टडी करताना दिसायचं. ग्रुप मध्ये डिस्कशन करून स्टडी केल्यामुळे कमी वाचुनपण जास्त स्टडी व्हायचा. ग्रुप स्टडी चा फायदा हा की, कधी कधी अभ्यास करताना एखादा **Concept** अवघड जात असेल किंवा समजत नसेल तर ज्याला तो चांगला येत आहे किंवा समजला आहे तो इतरांना समजून सांगायचा. त्यामुळे सुद्धा अभ्यास करताना बरीच मदत व्हायची. डिस्कस केल्यामुळे **Concept clear** व्हायचे आणि लक्षात राहायचं. 😊

**********************************************************

# ५. Exams आणि Results

**PL** संपली की पेपर चालु व्हायचे. तो तर काळ पूर्ण टेन्शन चा ! पेपर ज्यादिवशी असेल त्याच्या आदल्या दिवशीपर्यंत कुणालाही विचारा अभ्यास झाला का? तेव्हा, ‘अजून काहीच नाही’, ‘सुरवात करायची आहे’, ‘नाईट स्टडी करून काढणार आहे’, ‘चालु आहे’, अशी उत्तरे मिळायची. आपला पण अभ्यास झाला नसेल किंवा थोडा राहिला असेल तर समाधान वाटायचे की चला कुणीतरी सोबत आहे. पण प्रत्यक्षात जेव्हा पेपर यायचा तेव्हा हेच लोक पेपर मधून डोकंसुद्धा बाहेर काढत नसायचे 😃 आणि बाहेर येऊन म्हणायचे काहीच लिहिलं नाही फेल होणार आता. पेपर हातात आला की ज्यांचा अभ्यास झालेला असायचा ते लोक पेपर मध्ये डोकं घालून बसायचे आणि ज्यांनी केला नाही अशा लोकांची शिक्षकाची नजर चुकवून चुळबुळ चालु व्हायची. पेपरचे 3 तास म्हणजे दिव्यच असायचं. लिहिता येईल तेवढा पेपर लिहायचो. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत! जोपर्यंत पेपर संपल्याची बेल झाल्यावर शिक्षक येऊन पेपर घेत नाहीत तोपर्यंत लिखाण चालूच असायचे. यात मजेदार गोष्ट अशी की मॅक्सिमम प्रश्नांची उत्तरे शेवटच्या क्षणातच आठवायची. मग तुटून पडायचो पेपरवर. काही मुलं खूपच चमत्कारिक असायची. पेपर लिहिताना शिक्षक समोर असतील तर एकदम शांतपणे पेपर लिहिल्यासारखं करायची आणि त्यांची पाठ फिरली की चुळबुळ चालु. मग एकदोन वेळा लक्षात आल्यावर शिक्षकच रागवून त्यांची बैठक व्यवस्था बदलायचे तेव्हा कुठे ती शांत बसायची. एक एक पेपर संपेपर्यंत जेवणाकडं सुद्धा नीट लक्ष असायचं. कधी एकदाची परीक्षा संपतेय असा व्हायचं. 😥

खरं तर परीक्षा हासुद्धा एन्जॉय करण्यासारखा इव्हेंट होऊ शकतो पण सुरुवातीपासून अभ्यास केला तर. सुरुवातीपासून थोडी मौज, थोडा अभ्यास केला केला तर सगळं सहज शक्य आहे. मी असं म्हणत नाही की २४ तास पुस्तकच घेऊन बसलं पाहिजे. माणसाने सतत काहीतरी नवीन शिकण्याचा प्रयत्न करावा. त्यावेळी वयाचे बंधन नसते. शिकण्याला कसलेच बंधन नसते. आपण आयुष्यभर विद्यार्थीच राहावे. फक्त सगळ्या गोष्टीत समतोल साधता आला पाहिजे. ज्याला हे जमलं तोच आयुष्यात काहीतरी करू शकतो. 😎

मुलं इथंच चुकतात. एकतर पूर्ण वेळ अभ्यास नाहीतर मग पूर्णवेळ टाइमपास. सतत टाइमपास करणं, बाहेर फिरणं, बाहेर खाणं, महागडे मोबाइल आणि गाड्या वापरणं हे सगळं केलं म्हणजे एन्जॉय केला असं मुलांना वाटतं. या परिस्थितीमध्ये खरंतर आयुष्य एन्जॉय केलेलंच नसतं. फक्त समज झालेला

असतो. यात जे पूर्णवेळ फक्त अभ्यासात घालवतात दुसरं काहीच करत नाहीत त्यांना जॉब तर मिळतात पण आयुष्यातल्या खूप सुंदर क्षणांना ते मुकलेले असतात. कॉलेजच्या आठवणींच्या नावाखाली त्यांच्याकडं काहीच नसते. नुसता अभ्यास. तो चांगले मार्क्स चांगली डिग्री चांगला जॉब नक्कीच मिळवून देईल यात शंकाच नाही पण यासोबतच जे क्षण फ्रेंड्स सोबत कॉलेजमध्ये अनुभवायचे असतात जे क्षण जगायचे असतात ते त्यांनी मिस केलेलं असतात. जे परत कधीच येणार नसतात. वेगळं काहीच केलेलं नसतं त्यामुळे एका ठरलेल्या फॉरमॅट मध्ये आयुष्य जगायची सवय लागलेली असते.

यांप्रमाणेच दुसऱ्या कॅटॅगरीतली मुलं म्हणजेच पूर्णवेळ टाइमपास करणारी मुलं! ही आयुष्यातला महत्वपूर्ण वेळ अशा गोष्टीत वाया घालवतात ज्यांना काहीच महत्व नसते. त्यामुळे पुढे जेव्हा बाकीच्या क्लासमेट्सना जॉबच्या चांगल्या चांगल्या संधी चालून येतात, काही हुशार मुलं स्वतःचा बिझिनेस उभा करायच्या हेतूने वाटचाल करतात, अशा वेळी या टाइमपास करणाऱ्या मुलांचे सब्जेक्ट बॅक राहिलेले असतात. पुढे काय करणार आहे माहिती नसतं. डोक्यात नुसता गोंधळ असतो. शेवटी शिक्षण संपते पण हाती काहीच लागलेलं नसतं.

वरील दोन्ही प्रकारांपेक्षा किंचित वेगळा हा तिसरा प्रकार. त्यात खूप कमी मुलं येतात पण तेच पुढे जाऊन काहीतरी वेगळं करतात. ती मुलं अभ्यासाच्या वेळी अभ्यास, मजेच्या वेळी मजा, सगळंच एन्जॉय करतात. कॉलेज मधल्या सगळ्या ऍक्टिव्हिटीज मध्ये असतात. विशेष म्हणजे या मुलांना कशातही सहभाग घेण्यासाठी शिक्षकांना प्रयत्न करावे लागत नाहीत तर ही मुलं स्वतःहून अगदी उत्साहाने सगळीकडे सहभागी होतात. भलेही बक्षीस मिळो अथवा ना मिळो पण सहभाग खूप महत्वाचा. या मुलांचे फ्रेंड सर्कल पण मोठे असते. ते शिक्षकांचीही आवडते असतात. ते आपलं आयुष्य ९ ते ४ कॉलेज या फॉरमॅट मध्ये कधीच बांधून ठेवत नाहीत. प्रत्येक गोष्ट तितकीच आवड आणि उत्साहाने करतात. मग त्यात वेळेचे बंधन ते मानत नाहीत. कदाचित त्यामुळेच ते आयुष्य खऱ्या अर्थाने एन्जॉय करतात.😊

स्वतःच्या आवडीचे काम करण्यात एक वेगळाच आनंद असतो आणि ते करताना वेळ काळ यांचे कसलेच बंधन नसते. ते काम मनाला आनंद आणि समाधान देते. याचे उदाहरण मी स्वतः आहे. मला माझ्या आवडीचे काम करताना कधीच कंटाळा येत नाही.  आणि ते पटकन कसेतरी संपवून रिकामे व्हावे असेही वाटत नाही. त्याचप्रमाणे एका विशिष्ट वेळेतच ते पूर्ण व्हावे असेही काही नाही.जेव्हा मनात येईल तेव्हा करायचे. म्हणून मी सांगितलेल्या गोष्टी काल्पनिक नसून अनुभवाचे बोल आहेत. मुलांच्या भाषेत

त्या **Therotical** नसून **Practical** आहेत. त्यामुळे हातात घेतलेले कुठलेही काम मन लावून केले तर वेळही वाया जाणार नाही आणि कामही चांगले होईल. पण बहुधा मुलं तसं करताना दिसत नाहीत. थोडंसं हेवी झालं. तरीपण परिणाम काय होतात हे जाणून घेतल्यानंतर मुलं सगळ्या गोष्टींचा नक्कीच **Positively** विचार करतील असा मला विश्वास आहे.

आता थोडाश्या गमती सांगते.

कशातरी परीक्षा झाल्या की वेध लागतात ते **Results** चे. **Result** हासुद्धा एक सोहळाच असतो जणू ! सोहळा या कारणाने की खूप वेगवेगळे मजेशीर प्रसंग यात घडतात. ते खालीलप्रमाणे:

म्हणतात ना मित्र फेल झाला तर खूप वाईट वाटते पण जास्त वाईट तेव्हा वाटते जेव्हा मित्राला आपल्यापेक्षा कमी अभ्यास करून जास्त मार्क्स मिळतात. असेही अनुभव बघायला मिळत. **Results** लागल्यावर वातावरण फार संमिश्र असायचे. एकीकडे काहीजण अपेक्षेप्रमाणे **Result** लागला म्हणून कुणी आनंदी असायचे, पार्टीचे नियोजन करायचे, तर दुसरीकडे कुणाचा बॅकलॉग, कुणाची KT लागलेली असायची त्यामुळे ते दुःखी असायचे, तर कुठे आपल्या शेजारी बसणाऱ्या मित्राला आपल्यापेक्षा जास्त मार्क्स कसेकाय पडले या विचाराने आश्चर्यचकित झालेले चेहेरे बघायला मिळायचे. टॉपर्स चे तर विश्वच वेगळे. एवढ्या पॉईंट्स ने माझे **Distinction** गेले, माझा पहिला रँक गेला या काळजीत असायचे.

काही लोकं तर एवढी हुशार की आधी मित्राचा रिझल्ट बघायचे आणि त्यावरून स्वतःबद्दल अंदाज बांधायचे. समजा मित्र आपल्यापेक्षा कमी हुशार आहे आणि तरीही त्याचे सर्व विषय निघून तो चांगल्या मार्क्स नी पास झाला असेल तर मग विचार करायचे "हा पास होऊ शकतो तर मी नक्की होणार" आणि मग आनंदाने आपला रिझल्ट बघायचे .पण बऱ्याच वेळेला असे अंदाज चुकायचे.

यात काही मुलंमुली अशीही होती जी आपापले मित्रमैत्रिणी नापास झाले असतील किंवा त्यांचे विषय बॅक राहिले असतील तर त्यांना मानसिक आधार देण्याचे काम करायचे. फेल झालेल्यांना कुणी सारखा सारखा **Result** विचारू नये असे इतर मुलामुलींना सांगायचे, जेणेकरून आपल्या मित्र किंवा मैत्रिणीला मानसिक त्रास होऊ नये. त्यांना पुढच्या वेळी चांगला अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहित करत. बरीचशी मुलंमुली घरचे रागावतील या भीतीने खराब लागलेला रिझल्ट घरी सांगण्यासाठी संकोच करत,

पण अशा वेळी त्यांचे मित्रमैत्रिणींच त्यांना मानसिक आधार देत, घरी **Result** सांगण्यासाठी मानसिक बळ देत, तसेच प्रसंगी त्यांच्या घरच्या माणसांना सुद्धा आश्वस्त करत की पुढच्या सेमेस्टर मध्ये सगळं काही ठीक होईल. इथंच खऱ्या अर्थाने निखळ मैत्री अनुभवायला मिळायची. चांगले मार्क्स मिळवण्यासाठी स्पर्धा तर असायचीच पण ते मिळाल्यावर त्याचा गर्व न करता जे मागे राहिले आहेत त्यांना प्रोत्साहित करून पुढे आणणे हेच यशस्वी माणसाचे लक्षण आहे आणि मैत्रीचेसुद्धा. हेही अनुभव आले. त्यामुळे आपल्याला चांगली संगत असणे खूप महत्वाचे आहे. हे वेळीच समजले पाहिजे नाहीतर मौजमजा करताना सगळे सोबत असतात पण एखादा विषय गेला किंवा मागे राहिलं की लगेच मैत्रीची व्याख्या बदलते. त्यामुळे वेळीच चांगली संगत ओळखून वाईट संगतीपासून लांब राहणे किंवा त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करणे केव्हाही चांगले.😊

😊इलेक्ट्रॉनिक्स च्या भाषेत सांगायचे झाले तर तुमच्यात एक असे **Circuit Develop** करा जे **Input Positive** आणि **Negative** दोन्ही घेईल पण **Output** मात्र फक्त **Positive** देईल.😊

**********************************************************

## ६. Gathering (Cultural Events)

परीक्षा साधारण डिसेम्बर पर्यंत संपायच्या. मग सुट्ट्या, धमाल!🤗 त्यानंतर जानेवारी उजाडायचा तो सोबत गुलाबी थंडी, उत्साह, अजून एन्जॉय, वेगवेगळे डेज, कल्चरल इव्हेंट्स सोबत घेऊन. मी आधी म्हणाले तसं सुरुवातीला या कार्यक्रमांचे वेळापत्रक लागले की खूप मोजकी मुलं लगेच तयार होत उत्साहाने आपला सहभाग दर्शवायची. मग बाकीच्यांना शिक्षक प्रोत्साहित करायचे. शेवटी नाही-हो म्हणत मोठ्या संख्येने सहभाग व्हायचा. आधी प्रॅक्टिस सेशन्स, मग ऑडिशनस, आणि सिलेक्शन असा कार्यक्रम असायचा. आम्ही पहिले १ वर्ष कशात भाग घेतला नव्हता, पण नंतर समजायला लागलं की हे दिवस पुन्हा नाहीत. मग त्यानंतर आम्हीही उत्साहाने आमचा सहभाग दाखवायला लागलो. ऑडिशन्स हा एक खूप मनोरंजक भाग असायचा. त्यात तुमचं पूर्ण गाणं किंवा पूर्ण सादरीकरण करणं आवश्यक नसायचं. तुम्ही गॅदरिंग मध्ये जे काही करणार आहे त्याची छोटीशी रंगीत तालीम असायची. मग २ ते ३ मिनिटात ते थोडंसं सादर करावं लागायचं. मग त्यात ग्रुप डान्स असेल तर **Co-ordination, Perfection** इतकं नसायचं. बऱ्याच वेळा मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी किंवा त्यांनी सहभाग घ्यावा म्हणून त्यांच्या थोड्याफार चुका झाल्या तरी त्यांना चुका सांगून त्या दुरुस्त करून अजून एकदा ऑडिशन द्यायला सांगितले जायचे. त्यांनी चुका दुरुस्त केल्यावरच त्यांचं सिलेक्शन व्हायचं. कित्येक मुलंमुली परफेक्शन च्या पलीकडं जाऊन एन्जॉय म्हणून सहभाग घायची. ऑडिशन मध्ये सिलेक्ट होवो ना होवो पण स्पर्धेचा अनुभव घ्यायची. त्यामुळे ऑडिशन्स बघण्यासारख्या असायच्या.😊

गॅदरिंग मध्ये **Fashion Show, Group Dancw, Drama, Solo Dance** असे वेगवेगळ्या प्रकारचे खूप सारे परफॉर्मन्स असायचे. मग त्यांचे ऑडिशन्स बघताना मजा यायची. फॅशन शो मध्ये कोण चालता चालता कुठे थांबायचं हे विसरल्यामुळे मधेच थांबलाय. डान्स करता करता कोण मधेच स्टेप्स विसरलं, ग्रुप डान्स मध्ये सगळे एकच डान्स स्टेप करतात आणि एकदोघे काहीतरी वेगळंच करतायत, एखाद्याला कुठलीच डान्स स्टेप आठवत नसल्यामुळे तो बाकीच्यांचं बघून काहीतरी करण्याचा प्रयत्न करतोय, कुणाचं गाणं चुकीचं लावल्यामुळे डान्स करताना उडणारा गोंधळ, आणि यातच समोरचा ऑडियन्स, आणि परीक्षक यांच्या दडपणामुळे घाबरून स्टेप्स विसरलेलो आम्ही!😂 हे सगळं इतकं लक्षात येत की आताही आठवून चेहेऱ्यावर हसू येत. हे सगळं आम्ही खुपचं छान अनुभवलेलं आहे. काही डान्स तर

इतके परफेक्ट असायचे की बघतच राहावेसे वाटायचे. याहीपेक्षा जास्त परफेक्शन विसरून केलेले डान्स सिलेक्ट नाही झाले तरी लक्षात मात्र राहिले. 😊

हे दिवस खूपच सुंदर असायचे. एकतर **Days, Celebration**, गॅदरिंग यामुळे युनिफॉर्म ला सुट्टी असायची त्यामुळे सगळे खुशीत असायचे. हो! पण जेव्हा सुट्टी असेल तेव्हाच! इतर वेळी युनिफॉर्म घालण्याचा नियम आम्ही सगळे काटेकोरपणे पाळत असू. **Days** मध्ये **Chocolate Day, Traditional Day, Mismatch Day, Saari Day, Twins Day** असे वेगवेगळे **Days** असायचे. **Traditional Day** ला सगळे छान तयार होऊन यायचे. छान दिसायचे. दिवसभर फोटोशूट चालायचे. त्यात मुलांची मैत्रिणींसोबत फोटो काढण्याची घाई बघून मजा यायची. मुली साड्या तर मुलांसाठी टाय डे असायचा. कॉलेज सर्व रंगानी भरून जायचे. नुसती मजा मस्ती. विशेष म्हणजे या काळात शिक्षकही मनमोकळेपणाने वागू द्यायचे. रागवत नसत. उलट विविध गोष्टींमध्ये सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करायचे. **Funfair** मध्ये वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचे लावले जायचे. तेही एक वेगळेच दृश्य असायचे. 🤗

ट्रॅडिशनल डे ला फिशपॉन्ड असायचा. यामध्ये आपल्याला ज्याच्यावर फिशपॉन्ड टाकायचा असतो त्याचा नावाने आपल्याला जे लिहावे वाटते ते त्याच्याबद्दल लिहून एका बॉक्स मध्ये टाकायचे. तो बॉक्स कितीतरी दिवस आधीपासून कॉलेज मध्ये ठेवला जायचा आणि ट्रॅडिशनल डे दिवशी उघडून एक एक करून फिशपॉन्ड वाचले जायचे. हा प्रकार आधी कधीच पहिला नव्हता. कॉलेज ला गेल्यावर समजला. त्यात तर एकमेकांची इतकी खेचाखेची असायची की विचारायलाच नको. एकतर तो कोणी टाकला हे काळात नसायचं आणि कोणीही कोणावरही टाकू शकत असायचं. त्यात मुलगा मुलगी, क्लास असली बंधन नव्हती त्यामुळे आपल्या मित्रमैत्रिणींचे चेष्टामस्करी करण्याची ही अप्रतिम संधी असायची. ती वर्षातून एकदाच मिळायची त्यामुळे ती शक्यतो कोण घालवत नसायचं आणि घालवू पण नये. 😉 मुली त्यांच्या मैत्रिणीवर, मुलं त्यांच्या मित्र मैत्रिणी किंवा ग्रुपवर टाकायचे. एकदा फिशपॉन्ड वाचायला सुरु झाले की वेळ कसा निघून जायचा कळतही नसायचे. मुलं एखादं लेक्चर बंक करतील पण हा कार्यक्रम कधीच बुडवत नसायचे. त्यातल्या त्यात स्वतः कुणावर फिशपॉन्ड टाकला असेल तर त्या व्यक्तीची प्रतिक्रिया बघण्यासाठी हजर असायचेच.

आणखी एक मुद्दा राहिला. बाकी ब्रँचेस च्या तुलनेत मेकॅनिकल ला एकतर मुली नसत किंवा खूप कमी प्रमाणात अगदी बोटांवर मोजण्याइतक्या असत. मग या मुलांसाठी **Days** म्हणजे पर्वणीच असायची, कारण यामुळे त्यांना मुलींशी बोलता यायचं. पण या मुलांच्या बाबतीतली एक खास गोष्ट अशी की या मुलांमध्ये **Leadership qualities, Management Skills, Active Participation** हे गुण फारच छान **Develop** झालेले असत. ही मुलं पण सगळ्या गोष्टींमध्ये उत्साहाने सहभाग घ्यायची. गॅदरिंग मध्ये तर "पिस्टन पॉवर" या आवाजाने पूर्ण कॉलेज घुमायचं. मुलीही काही कमी नसत. त्यापण तशाच धाडसी, ॲक्टिव्ह असायचा. कमी होत्या पण त्याही त्यांचं अस्तित्व त्यांच्या कामातून दाखवून द्यायच्या. प्रत्येक गोष्टीत सहभागी व्हायच्या.😊

हे दिवस जर कुणी जगले नसेल किंवा जगत नसेल तर तो व्यक्ती आपल्या आयुष्यातला सर्वात इंटरेस्टिंग काळ वाया घालवत आहे असे मी म्हणेन, कारण या आठवणी आयुष्यभर मनात राहतात. मनाला आनंद देतात. या निमित्ताने तुमचा संपर्क वाढतो. फ्रेंड सर्कल वाढते. एकमेकांमध्ये मदत आणि सहभागाची, एकात्मतेची भावना निर्माण होते. टीम वर्क चे महत्व समजते. मग शिक्षण पूर्ण झाल्यावर पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, किंवा वेगवेगळे कोर्सेस करायची गरज नाही. जर तुमच्या या सर्व गोष्टी कॉलेज मध्येच डेव्हलप होत असतील तर सहभाग का घेऊ नये?

आणखी एक मुद्दा म्हणजे यातसुद्धा एक ट्विस्ट येत असायचा. कधी कधी गॅदरिंग किंवा त्याच्या १, २ दिवस आधी **Results** लागायचे. मग ज्यांचा **Result** चांगला लागला आहे त्यांचा सहभाग कायम राहायचा पण ज्यांचा खराब लागला आहे अशा लोकांना परफॉर्म करायला तयार करणे हे आव्हानच असायचे. पण तरीही हेही आव्हान आम्ही सहज पेलायचो. त्यासाठी मग जे काही सुचेल ते करायचो. यात मग त्यांना इमोशनल ब्लॅकमेलिंग खूप चालायचं. त्यातल्या त्यात शेवटचं वर्ष असेल तर जास्तच. “आता थोडेच दिवस राहिलेत”, “हे शेवटचं गॅदरिंग” अशी काही वाक्ये वापरली की ते कसेबसे तयार व्हायचे आणि एकदाचा गॅदरिंग चा दिवस उजाडायचा. गॅदरिंग मध्ये पण फुल्ल धमाल. जे चेहरे कधी क्लास मध्ये दिसले नाही ते गॅदरिंग मध्ये क्रेडिट घेऊन जायचे. कधी संपूच नये असं वाटायचं गॅदरिंग. एकदा चालू झालं की सगळे त्या विश्वात हरवून जायचे. वेगवेगळे **Competitions** चं **Prize Distribution** पण असायचं. खरी स्पर्धा यावेळीच पाहायला मिळायची. यात मग ज्या डिपार्टमेंटला सगळ्यात जास्त बक्षिसं मिळतील त्यांची वर्षभर चांगलीच छाप पडायची आणि ते वर्षभर चर्चेत राहायचे. त्यामुळे सगळे अगदी मन लावून सगळं

एन्जॉय करायचे. मुलामुलींचे फनी डान्स, लेझी डान्स बघताना हसून हसून पोट दुखायचं. तर असे हे सोनेरी दिवस कसे भुर्रकन उडून जायचे कळायचं पण नाही, पण आठवणी मात्र ठेऊन जायचे आणि अजूनही त्या ताज्या आहेत.😊



**५. गॅदरिंग**

*********************************************************

# ७. Industrial Visit

दरवर्षीची **Industrial Visit** हा एक महत्वपूर्ण टप्पा असायचा. प्रत्येकजण हे अनुभव घ्यायला उत्सुक असायचा. आम्ही दरवर्षी व्हिजिट कधी निघते याची खूपच उत्सुकतेने वाट बघायचो. शिक्षक लेक्चर ला आले की व्हिजिट कधी जाणार या प्रश्नाने नुसता गोंधळ घालायचो. एकदाची जाणार हे ठरलं की प्रत्येकजण तयारीला लागायचा. बसचं नियोजन, जेवणाचं नियोजन, कोणकोणत्या इंडस्ट्रीज बघायच्या, कोणती ठिकाणे बघायची हे सगळं शिक्षकांसोबत मिळून ठरवायचो, आणि विशेष म्हणजे यात सर्व विद्यार्थी उत्साहाने भाग घेत. स्वतःहून सगळ्या जबाबदाऱ्या घ्यायचे. कोणी जेवणाची, कोणी बसची, कोणी नियोजनाची. सर्वांचा इतका उत्साह बघून शिक्षकांनाही आनंद वाटे.😊

इथेच खरं मॅनेजमेंट स्किल डेव्हलप होत असायचं. यावेळी बऱ्याच लोकांना घरून व्हिजिट साठी परवानगी मिळत नसे. काहींच्या घरच्या अडचणी असत तर काहीजण मित्र, मैत्रीण येणार नाही म्हणून येत नसत. अशा वेळी जे येणार नाहीत त्यांना कन्व्हिन्स करण्याचं कामही मुलं आपापसात करत. सगळ्यांना तयार करणे खूप महत्वाचं वाटायचं कारण सगळे असल्याशिवाय मजा येत नसायची. जोपर्यंत पूर्ण क्लास नसेल तोपर्यंत मजा येत नसायची. प्रत्येकालाच असं वाटायचं की सगळ्यांनी यावं. असे टप्पे पार करत करत सगळ्यांना तयार करायचो. क्वचितच एखाद्याची फारच अडचण असेल तर तो सोडून बाकी सगळे तयार व्हायचे. एकदाचा तो दिवस उजाडायचा. मग प्रत्येकाच्या घरी फोन करून व्हिजिट बद्दल कळवणे, शिक्षक सोबत जाणार असल्याने पालकांनी काळजी करू नये असे त्यांना आश्वस्त करणे, अट्टेण्डन्स घेणे ही कामे शिक्षकांकडे असायची. शक्यतो संध्याकाळी उशिरा निघणे व्हायचे. तेव्हा बऱ्याच मुलामुलींचे पालक त्यांना सोडवायला येत असायचे.

सगळे आलेत का हे बघून सगळे नियोजन बघून अखेर व्हिजिट चा श्रीगणेशा व्हायचा. बस सुरु व्हायची. बस सुरु झाली रे झाली की आमचा गोंधळ सुरु. अशावेळी कितीही दंगामस्ती केली तरी कुणी ओरडत नसायचं. त्यामुळे सगळेच जोरात ओरडायचे, गाण्याच्या भेंड्या, डान्स, जोक्स, सगळं चालायचं. घसा दुखेपर्यंत काहीजण ओरडायचे. इतके की परत आल्यावर २ दिवस आवाजच निघत नसायचा. हा कार्यक्रम पहाट होईपर्यंत चालायचा. मग एखाद्या ठिकाणी बस थांबली की नाश्ता वगैरे व्हायचा. त्यानंतर ज्या इंडस्ट्रीज ठरलेल्या आहेत त्या बघायला निघायचो. एखाद्या कंपनी मध्ये गेल्यावर कसं बोलायचं, कसं वागायचं, कोणत्या सूचना पाळायच्या आहेत हे शिक्षकांनी आम्हाला आधीच सांगून ठेवलेलं असायचं.

आम्हीदेखील तसंच वागायचो. एखाद्या कंपनी मध्ये गेलं की शांतपणे छोटे छोटे ग्रुप्स करून आम्ही तिथले लोक जे काही माहिती देतील ते शांतपणे ऐकून घ्यायचो. सोबत एक नोटबुक असायची त्यात महत्वाची वाटलेली माहिती लिहूनही घ्यायचो. काही शंका असतील तर त्यांना प्रश्नही विचारायचो. यात एक अनुभव असाही आला की कंपनी कितीही मोठी असो आणि व्हिजिट करणाऱ्यांची संख्या किती का असेना तिथले लोक तेवढ्याच शांतपणे आणि उत्साहाने सर्व माहिती देत असत. आमचा क्लास मोठा असल्याने छोटे ग्रुप्स करून माहिती द्यावी लागायची. आम्हीसुद्धा बसमध्ये इतकी दंगामस्ती करायचो पण कंपनी मध्ये गेलो की शिक्षकांच्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करायचो. मग सगळं बघून झालं की आम्ही पुढील मार्गासाठी मार्गस्थ व्हायचो. अशाच प्रकारे २ ३ कंपनीज बघून झाल्या की काही निसर्गरम्य ठिकाणेदेखील बघायचो. खूप फोटो काढायचो. सगळ्या आठवणी मनात साठवायचो.









## ٤. Industrial Visit

*******************************************************

## ८. Extra-Curricular Activities

कॉलेजमध्ये अभ्यासाला जितकं महत्व असतं तितकंच महत्व **Extra Curricular Activities** ना असतं. यातूनच तुमचं स्टेज डेरिंग, मॅनेजमेंट स्किल्स, सोशल अवेअरनेस, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट होत असतं. मग ते गॅदरिंग असो किंवा NSS सारख्या सेवांमध्ये काम करणे. आम्ही प्रथम वर्षात असताना या सर्व गोष्टींची जाणीव नव्हती त्यामुळे कशात जास्त सहभाग घेतला नाही. पण जेव्हा समजायला लागलं की अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टीही करायला हव्या, आपले छंद जोपासायला हवे, स्वतः आणि कुटुंबासोबतच सामाजिक बांधिलकीही तितकीच महत्वाची. सतत काहीतरी नवीन शिकण्याचा प्रयत्न करणे या जाणिवेतूनच अभ्यासासोबत इतर ऍक्टिव्हिटीज मध्ये भाग घेऊ लागलो.😊

माझी पहिली ऍक्टिव्हिटी होती कॉलेज मॅगझीन साठी लेख लिहिणे. आधी कधी लिखाणाबद्दल तितका विचार केला नव्हता, पण एक आकर्षण होतं. का कुणास ठाऊक पण जेव्हा कुणाचंही पुस्तक किंवा लेख वाचनात यायचा तेव्हा वाटायचं की आपणही लिहावं. दरवर्षी कॉलेजचं मॅगझीन निघायचं त्यामध्ये विद्यार्थी आपले लेख, जोक्स, कविता, कथा लिहून द्यायचे. मग त्यातील निवडकच लिखाण मॅगझीन मध्ये छापले जायचे. मग मीही लिहायचं ठरवलं. सिलेक्ट होईल का नाही हा विचार केला नाही. फक्त आवड म्हणून मनापासून लिहिलं आणि काय आश्चर्य! लेख सिलेक्ट झाला. छापला तर गेलाच पण विद्यापीठाच्या स्पर्धेत विनोदी लेख या प्रकारात त्याला दुसरा क्रमांक देखील मिळाला. तेव्हा एक आत्मविश्वास वाढला मिळाला की आपणही लिहू शकतो. मग काय दुसरे, तिसरे, आणि चौथे सलग तीन वर्षे लेख लिहीत राहिले. हाच छंद पुढे इतरांना प्रेरणा देण्यासाठी उपयोगी पडला. "**१४/०२ एक शौर्यकथा**", "**अन्नदाता सुखी भव:**" ही २ पुस्तके माझ्याकडून लिहिली गेली. जी सामाजिक बांधिलकी जपणारी, प्रेरणात्मक समाजउपयोगी आहेत आणि तिसरे पुस्तक जे विद्यार्थ्यांसाठी लिहीत आहे. तसेच सांगण्यास अत्यंत आनंद होतोय की या २ पुस्तकांना सर्वच स्तरांमधून भरघोस प्रतिसाद देखील मिळालेला आहे. 😊

दुसरी ऍक्टिव्हिटी होती NSS. NSS काय असतं याची थोडीफार माहिती होती पण त्यात कधी भाग घेतला नव्हता. तशी सामाजिक बांधिलकी ही मनाच्या एका कप्प्यात होतीच. मग ठरवून टाकलं हेही करून बघायचं. मग काय विद्यापीठात ७ दिवसांसाठी एक श्रमदानाचा कॅम्प NSS कडून आयोजित

करण्यात आला होता. आम्ही सगळे मुलं मुली मिळून ५० च्या आसपास विद्यार्थी असतील. सगळे मिळून श्रमदान करायचो. दुपारी जेवण, परत थोडं श्रमदान आणि संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रम असायचे. या कॅम्प मध्ये मजा आली यापेक्षा समाधान मिळाले असे मी म्हणेन, कारण सगळे मिळून इतकं मन लावून काम करायचे की वेळ कसा जायचा कळतच नसायचे. प्रत्येक जण आपलं म्हणून काम करायचा. शिक्षकही खूप प्रेरणा द्यायचे. हसत खेळत कॅम्प कधी संपला समजलेसुद्धा नाही. या कॅम्पमधून टीमवर्क, सामाजिक बांधिलकी हे खूप चांगल्या प्रकारे शिकता आले. जोपर्यंत हे शिकत नाही तोपर्यंत आपण स्वकेंद्रित राहतो. आपले शिक्षण, आपले काम याचा समाजासाठी काही उपयोग होणार असेल तर त्यात वेगळेच समाधान असते. ते अनुभवायचे असेल तर बाहेर पडून जगाशी संवाद साधने खूप महत्वाचे आहे. अशा कॅम्पच्या माध्यमातून ते साध्य होते. 👍

तिसरी ऍक्टिव्हिटी होती गॅदरिंग मध्ये सहभाग. तिसऱ्या वर्षापर्यंत ही गोष्ट आपल्याला जमणार नाही, येणार नाही म्हणून असलं काही करायचं नाही हे ठरवूनच टाकलं होत, पण शेवटच्या वर्षी सगळ्यांनीच असा विचार केला की हे दिवस पुन्हा नाहीत, हीच शेवटची संधी. पुन्हा कॉलेज नसणार, मित्रमैत्रिणी नसणार आणि गॅदरिंग सुद्धा नसणार. मग काय एक एक करून आम्ही पूर्ण क्लास ला तयार केले. ज्यांना डान्स येत होता त्यांनी बाकीच्यांना शिकवायचे असा कार्यक्रम चालायचा. आधी वाटलं आपलं स्टेज वर काही चुकलं तर सगळे हसतील पण परत विचार केला सगळे आपलेच आहेत चूक झाली तरी सांभाळून घेतील. आम्ही स्पर्धा म्हणून नाही तर एन्जॉय म्हणून करायचं ठरवलं होतं, त्यामुळे कुणी आपल्याला मार्क्स देतंय हे दडपण नव्हतं. हॉस्टेल चा एक आणि क्लास चा एक असे २ डान्स करून झाले.

चौथी आणि महत्वाची ऍक्टिव्हिटी म्हणजे बाहेरचे इव्हेंट अटेंड करणे. हे खूप महत्वाचे आहे जोपर्यंत आपण बाहेर पडून आपले टॅलेंट एक्सप्लोर करत नाही तोपर्यंत आपल्या Strengths आणि Weakness आपल्याला समजत नाहीत. आम्ही टेक्निकल, नॉन-टेक्निकल दोन्हीही इव्हेंट अटेंड करायचो. कॉलेज मधून पण अशा गोष्टींना खूप प्रोत्साहन मिळायचे. 😊

साधारण सप्टेंबर महिन्यात येणारा मोठा इव्हेंट म्हणजे विद्यापीठाचा युवा महोत्सव. यात विद्यापीठातील सर्व कॉलेजेस सहभागी असायची. दरवेळी वेगवेगळ्या कॉलेजेस मध्ये हा आयोजित केला जातो. त्यामुळे विविध कलांच्या स्पर्धा यात बघायला मिळत. यामध्ये कितीतरी गोष्टी बघण्यासारख्या आणि शिकण्यासारख्या असायच्या. पण याचीही जाणीव उशिराच झाली त्यामुळे यामध्ये प्रत्यक्ष भाग काही

घेऊ शकलो नाही पण अटेंड मात्र केले. सर्वच क्षेत्रातल्या स्पर्धा बघून आपण नक्की कुठं कमी पडतोय हे समजायचं. त्यामुळे सुधारणा करायला सुरवात व्हायची. आम्ही आवर्जून युवा महात्सव बघायला जायचो. यादरम्यानच कित्येक कॉलेजेस मध्ये टेक्निकल इव्हेंट्स चे आयोजन केले जायचे. त्यातही बक्षिसं मिळो ना मिळो आम्ही सहभागी व्हायचो. त्या निमित्ताने वेगवेगळी कॉलेजेस बघण्यात अली. स्पर्धा समजल्या. आपण टेक्निकली कुठं कमी पडतो हे समजायला मदत झाली. 😊

या ऍक्टिव्हिटीज सोबतच आमच्या कॉलेज मध्ये काही इव्हेंट असेल तर त्यासाठी **Volunteer** म्हणून काम करणे, कॉलेज मध्ये आयोजित केलेल्या सेमिनार्स, वर्कशॉप्स मध्ये सहभाग घेणे, इंजिनीअर्स डे, टीचर्स डे, फ्रेशर्स पार्टी, फेरवेल पार्टी, मिळून नियोजन करणे. यातही सक्रिय सहभाग घ्यायचो. बाहेरच्या कॉलेजेस मध्ये जाऊन आपल्या कॉलेजमध्ये आयोजित होणाऱ्या इव्हेंट्स चे कॅम्पेनिंग देखील करायचो.









## ७. NSS आणि EVENTS



सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

'विद्यार्थी कल्याण विभाग'

प्रशस्तिपत्र

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
यांच्या वतीने आयोजित केलेल्या
'सृजनरंग-२००९-१०' या नियतकालिक स्पर्धेत
श्री./कुमारी भाग्यश्री पाटील (अणुविद्युत संचार-२)
यांनी विनोदी लेख या कलाप्रकारात द्वितीय क्रमांक
मिळविल्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.
त्यांच्या या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन !

डॉ. संजय नवले
संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग

कुलगुरु,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

८.१ विनोदी लेखन प्रकारात मिळालेला दुसरा क्रमांक



Be Mighty 2012

BHAGYASHREE PATIL
BE - EXTC

इन्सान के अंदर छुपा हुआ 'रावण'

दोस्तो ! जैसा के हम जानते हैं, की इन्सान के अंदर बहुतसी भावनाए छुपी होती हैं । उनमे से बहुतसी अच्छी होती है और बुरी भी होती है । इन्सान हमेशा अपना अच्छा रूप दिखाता है, और यह कोशिश करता है की उसका

सिर्फ यही अपने बेटे को समझाने के लिए एक पिता अपनी जान गवा देता है । पिता के अंदर अच्छाई ही अच्छाई भरी होती है और बेटा बुराई को पसंद करता है । और उन दोनो की सोच से जन्म होते है रावण और जीवन । लेकीन आखिर

Bhagyashri S.Patil
TE (EXTC)

My name is Khan-A Review

As we know our society is very sensitive about terrorism based on the same topics would like to discuss a film named "My Name Is Khan" released on 13th Feb 2010.

My name is khan is a story of a person named

Later while waiting in a crowd to meet President Bush and repeating again and again. My name is khan and I am not a terrorist. Rizwan was arrested and placed in a prison by police who misinterpret this statement .while in a prison he is interrogated as a

८.२ मॅगझीनमधले लेख

*********************************************************

# ९. अभ्यास आणि Career

हा मुद्दा वाचायला घेतल्यानंतर जरा गंभीर आहे असे बऱ्याच जणांना वाटेल पण तसं काहीच नाही. अगदी हलक्या शब्दात मी याबद्दलचे माझे अनुभव सांगणार आहे. आतापर्यंत सर्वच गोष्टींना किती महत्त्व आहे ते आपण पाहिले. त्यात अभ्यासाचा पहिला क्रमांक लागतो. तो ज्या त्या वेळी केलाच पाहिजे. त्याला पर्याय नाही. कॉलेजकडून विविध एक्सपर्ट लेक्चर्स, विविध वर्कशॉप आयोजित केले जात. त्यामुळे आमच्या ज्ञानात आणखी भर पडत असे. हे खास विद्यार्थ्यांसाठी असतात त्यामुळे हे कधीच बुडवू नये. हे अटेंड करणे खुप महत्वाचे.

दरवर्षी आम्हाला **Personality Development** चे ट्रेनिंग असायचे. यामध्ये विविध गोष्टींवर भर दिला जायचा. जसे की स्वतःला **Interview** मध्ये **Introduce** कसे करावे, **Group Discussuion** कसे करावे, **Interview** ला जाताना **Dressing** कसे असावे, **Interview** कसा द्यावा, इत्यादी गोष्टींची तयारी करून घेतली जायची. ज्यामुळे कॉलेज संपल्यानंतर जेव्हा आपण प्रोफेशनल फिल्ड मध्ये जातो या गोष्टींचा खूप उपयोग होतो. **Communication Skill** चे **Sessions** असायचे ज्यामुळे इंग्लिश सुधारण्यास मदत झाली. आम्हीही एकमेकांसोबत इंग्लिशमध्ये बोलण्याचा प्रयत्न करू लागलो. प्रत्येक विषयाच्या **Theory** आणि **Practical** मुळे **Concepts** समजायला मदत झाली. जे वर्गात शिकायचो तेच प्रॅक्टिकली करून बघायचो. प्रॅक्टिकल्स चे रिपीटेशन **Session** असायचे. त्यामुळे आधी समजले नसेल तर तेव्हा जाऊन समजून घ्यायचो. प्रत्येक सेमिस्टर मध्ये ओरलच्या आधी इंटर्नल ओरल्स होत. त्यानिमित्ताने अभ्यास व्हायचा आणि मग फायनल ओरल च्या वेळी म्हणावा इतका त्रास झाला नाही.

**Industrial Training** मुळे काही दिवस **Technical Work** करण्याची संधी मिळाली. त्यातूनच खूप काही शिकायला मिळाले. जे काही पुस्तकातून शिकलो होतो ते प्रत्यक्ष पाहता आले. आत्मविश्वास वाढला. अनेक गोष्टी स्वतः करून पाहता आल्या. प्रामाणिकपणे आणि मन लावून शिकलो.





**Final Year** ला प्रत्येकाला एक प्रोजेक्ट करावा लागायचा. मग त्यासाठी ग्रुप मध्ये काम करावे लागायचे. त्यामुळे **Team Work** समजले. या निमित्ताने आपल्या **Ideas Implement** करता आल्या. **Innovative** गोष्टी करता आल्या. वारंवार होणारे **Project Seminars** मुळे **Stage Daring** वाढायला मदत झाली. तसेच **Presentation** करायचे असल्यामुळे **Presentation Skill** सुधारले. स्वतःसोबतच इतरांचेही **Project** आम्ही समजून घेत असू. त्यामुळे ज्ञानात भर पडत असे.

गॅदरिंग मध्ये किंवा स्पोर्ट्स मध्ये प्रत्येकजण आपल्या क्लास च्या टीम ला प्रोत्साहन द्यायचा त्यामुळे तिथे टीम स्पिरिट दिसून यायचे.😊

शेवटच्या वर्षी अनेक **Companies** चे **Campus Interviews** व्हायचे. त्यांच्या **Aptitude Tests**, **Group Discussions, Interviews** असे सेशन असायचे. **Rounds** असायचे. कॅम्पस येणार म्हटलं की आमची **Interviews** ची प्रॅक्टिस चालू व्हायची. यावेळी खरं तर समजतं की अभ्यास आणि **Extra Curricular Activities** ला किती महत्त्व आहे ते. प्रत्येक कंपनी ची वेगळी **requirement** असायची. कुणाला प्रत्येक सेमिस्टर ला **Distinction** पाहिजे असायचं, कुणाला **Overal Distinction** तर कुणाला ४ वर्षात एकही बॅकलॉग नको असायचा. मग या सगळ्यात **Eligible** होऊन पुढे गेलं तर **Rounds** असायचे. यात ज्यांचा **Resume Strong** असायचा, म्हणजेच अभ्यासासोबतच इतर गोष्टीही केलेल्या असायच्या त्यांची जास्त छाप पडायची ते लवकर सिलेक्ट व्हायचे.

कॉलेजमध्ये पास आऊट झालेल्या स्टुडंट्स ची **Alumni Meet** 🤝 असायची. त्यात सर्व सिनियर्स शी **Interaction** व्हायचे. मग ते त्यांचे अनुभव सांगायचे. बाहेर काय परिस्थिती आहे याची जाणीव करून द्यायचे. त्यांना तिथपर्यंत पोचण्यासाठी तयारी करून घेतल्याबद्दल शिक्षकांचे आभार

मानायचे. सर्वच विद्यार्थी **Career** मध्ये **Successfull** असायचे. त्यामुळे आम्हीसुद्धा मन लावून त्यांचे अनुभव ऐकायचो आणि आपणही असंच काहीतरी विशेष करू हे ठरवायचो. 😊

दरवर्षी जाणाऱ्या **Industrial Visits** मुळे **Actual Industry** काय असते, कशी असते, तिथे काय काम चालतं, आपण जे पुस्तकांमधून शिकतो त्याचा वापर कुठे आणि कसा केला जातो हे समजायला मदत झाली.

या गोष्टी खरं तर सगळ्याच कॉलेजेस मध्ये असतात पण विद्यार्थ्यांचा प्रतिसाद किती आणि कसा मिळतो यावर त्यांचे यश अवलंबून असते.😊

अभ्यास महत्वाचा आहेच पण करिअर निवडताना फक्त नोकरी म्हणून करिअर कडे बघू नका. तुम्हाला काय करायला जास्त आवडतं, कुठलं काम तुम्ही एन्जॉय करता यालाही खूप महत्त्व आहे, कारण नोकरी फक्त पैसा देईल पण आवडीचे काम समाधान देईल. नोकरीच करावी असा काही नाही. कुणाला UPSC, MPSC करावी वाटेल, कुणाला स्वतःचा बिझनेस उभारायला आवडेल, कुणाला शिक्षक, कुणाला **scientist** व्हायला आवडेल. कुणाला हे सर्व सोडून वेगळेच काहीतरी आवडीचे काम करायला आवडेल. तात्पर्य हेच की काय करायचंय हे कॉलेज मध्ये असतानाच ठरायला हवं आणि त्या दिशेने वाटचाल करायला हवी.😊

प्रत्येक माणसात काही ना काही कला नक्कीच असते. फक्त गरज असते ती या कलेला वाव देण्याची. एकतर तुम्ही तुमच्या आवडीच्या क्षेत्रात करियर करा किंवा करियर सोबत आवडीनिवडी, छंद जोपासा. आणि स्वतःमधल्या कलागुणांना वाव द्या. दोन्ही परिस्थितीमध्ये पैसाही मिळेल आणि समाधानही. स्वतःवर विश्वास ठेवा. तुम्ही मनात आणलं तर काहीही करू शकता. कुठलाही काम हातात घ्याल तेव्हा ते प्रामाणिकपणे करा. पैसा हा आयुष्यात नक्कीच महत्वाचा आहे, पण त्याचबरोबर मानसिक समाधान, आरोग्य या गोष्टीही तितक्याच महत्वाच्या आहेत. सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. असे केले तर तुमच्याच लक्षात येईल की आपली सकारात्मकता आपल्याला यशाकडे घेऊन जात आहे. 😊

आजच्या काळात मोबाइल न वापरता राहणे शक्यच नाही, कारण कित्येक वेळखाऊ कामे मोबाइलवर चटकन होतात. आपण जगाशी जोडले जातो. कितीतरी फायदे आहेत. पण त्याचबरोबर

अतिवापरामुळे होणारे तोटे देखील आहेत. त्यामुळे अजिबातच वापर करू नये असं नाही पण अतिवापर किंवा गैरवापरही करू नये जेणेकरून आपले फायद्याऐवजी नुकसानच जास्त होईल.

यातच विद्यार्थी आणि शिक्षक यांचे नाते खूप महत्वाचे असते. आमच्या मनात आमच्या शिक्षकांबद्दल प्रचंड आदर होता. ते कितीही रागवले तरी आम्ही कधी त्यांना उलट बोलत नसू. त्यांची प्रत्येक गोष्ट ऐकायचो. तेही आम्हाला खूप प्रोत्साहन द्यायचे. एखादी गोष्ट समजली नाही तर पुन्हा पुन्हा समजावून सांगायचे, आणि जोपर्यंत ही आदराची भावना आपल्यात येत नाही तोपर्यंत आपण यशस्वी होऊच शकत नाही असे मला वाटते. आजकालच्या डिजिटल युगात सगळं ऑनलाइन होत असल्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामधला संवाद कुठेतरी हरवत चाललं आहे असे मला वाटते.

कॉलेज मधील वेगवेगळ्या गोष्टींमधून आपली पर्सनॅलिटी डेव्हलप होत असते. आपल्याला नक्की काय करायचं आहे हे ठरविण्याचे हेच दिवस असतात. त्यामुळे या सोनेरी क्षणांना वाया न घालवता आपल्या भविष्यकाळाचा पाया घडवा. सगळ्या गोष्टीत उत्साहाने भाग घ्या. बक्षिस मिळेल का नाही हा विचार करू नका. तुम्ही जर १००% प्रयत्न केले तर यश नक्कीच मिळणार! कायम स्वतःला **Leader** च्या भूमिकेत पाहा. **Follower** नाही. आत्मविश्वास असू द्या. कुठलीही गोष्ट बोलताना, करताना पूर्ण बळाने, प्रामाणिकपणे आणि आत्मविश्वासाने करा. संगत चांगली ठेवा.😊

*********************************************************

# १०. निरोप समारंभ (Farewell)

निरोप समारंभ हा कॉलेज लाइफ मधला फारच भावनिक टप्पा आहे. पहिला दिवस आणि शेवटचा दिवस यात जमीन आस्मानचा फरक असतो. ज्यांची ओळखही नसते ते या कळत जिवलग मित्रमैत्रिणी झालेले असतात. शिक्षकांनी सुद्धा खूप कष्ट घेऊन आपले व्यक्तिमत्व सुधारलेले असते. अचानक सगळे सोडून जायचे ही भावनाच भावनिक करून जाते.

अभ्यास, मौजमजा, टवाळक्या, एकमेकांची चेष्टा मस्करी, निखळ मैत्री हे सर्व आयुष्याचा एक भाग बनलेले असते. एक दिवस जरी कॉलेजला गेलं नाही तरी चुकचुकल्यासारखं वाटत असतं. दिवस इतके वाऱ्यासारखे उडून जातात की निरोप समारंभाचा दिवस कसा जवळ येतो ते कळतही नाही, पण जेव्हा येतो तेव्हा खूप वाईट वाटत असते. शेवटी शेवटी तर तो दिवस येऊच नये असे वाटते.

मग याचं काळात आठवणी जमा करणे चालू होते. याचबरोबर प्रत्येक क्षणाचे फोटो जमा करण्याचेही काम चालू होते. एकमेकांचे फोन नंबर्स, पत्ते, जमवलेल्या आठवणी यांची देवाणघेवाण होते. याचं उत्तम उदाहरण म्हणजे स्लॅमबुक. एकदा स्लॅमबुक भरायला चालू झाले की सगळ्यांनी लिहून झाल्याशिवाय हा कार्यक्रम संपत नाही. स्लॅमबुक मध्ये आपल्या मित्रमैत्रिणींना आपली माहिती भरून द्यायची असते. त्यात नाव, पत्ता, फोन नंबर, आवडते खाद्यपदार्थ, आयुष्याबद्दल, मैत्रीबद्दलचे मत इत्यादी गोष्टी असतात. थोडक्यात जो लिहून देणार आहे त्याबद्दल सर्व माहिती असते. या आठवणी कायम सोबत राहतात. त्यानिमित्ताने भावना लेखी स्वरूपात आठवणीत राहायच्या. आज स्लॅमबुकची जागा फेसबुक आणि सोशल साईट्सनी घेतली आहे.

मला अजूनही आमचा निरोप समारंभ आठवतो. आमच्यासाठी कॉलेज मध्ये कार्यक्रम ठेवला म्हणून आम्ही सगळे खूप छान तयार होऊन गेलो होतो. आमचे शिक्षक आणि जुनिअर्स यांनी मिळून तयारी केलेली होती. मग गेल्यानंतर बराच वेळ आमचे सगळ्यांचे फोटोसेशन चालले. त्यानंतर कार्यक्रमाला जाऊन बसलो. त्यावेळी मनात संमिश्र भावना होत्या. एकीकडे सोनेरी भविष्याची स्वप्ने खुणावत होती, शिक्षण पूर्ण झाल्याचा आनंद होत होता तर दुसरीकडे आपल्या आवडत्या कॉलेजला सोडून जावे लागणार याचे दुःख वाटत होते. तरी सगळे हसऱ्या चेहेऱ्याने कार्यक्रमाला बसले होते.

सुरुवातीला विभागप्रमुख, शिक्षक यांचे बोलून झाले. मग आमच्यातले कुणी आपले अनुभव सांगण्यासाठी, बोलण्यासाठी इच्छुक आहे का असे विचारण्यात आले. मग काय, सगळ्यांना किती सांगू आणि किती नको असे झाले होते. बऱ्याच मुलामुलींनी पुढे येऊन आपले आपले अनुभव सांगितले. कितीतरी जणांचे डोळे बोलता बोलताच पाणावत आणि ते त्यांचे बोलणे तिथेच थांबवत. आमचीही अवस्था काही वेगळी नव्हती. आम्हीही सगळ्या आठवणी ऐकून भावनिक झालो होतो. अशाच आठवणी ऐकता ऐकता कार्यक्रम संपला आणि परत फोटोशूट झालं. यात दिवस कसा गेला समजलंच नाही. दिवस संपला पण आठवणी मात्र मनात राहिल्या. 😊



९. निरोप समारंभ







१०.१ कॉलेजच्या शेवटच्या दिवशी काढलेले काही फोटोज



१०.२. आमचा क्लास 🤗

तर असा हा सुंदर प्रवास प्रत्येकाने अनुभवावा. जमेल तितक्या आठवणी जमा कराव्या. वेळच्या वेळी अभ्यास आणि वेळच्या वेळी आयुष्य मोकळेपणाने जगावे. सर्व विद्यार्थ्यांनी आयुष्यात खूप मोठी उंची गाठून एक सुंदर भविष्य घडवावे हीच सदिच्छा !! 😊



************************************************************

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. भाग्यश्री पाटील यांचं ई साहित्यवरचं हे तिसरं पुस्तक.** यापुर्वीची त्यांची दोन्ही पुस्तके सामाजिक विषयांवरील होती. त्यांना वाचकांकडून अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. किसान आणि जवान यांच्याबद्दल अत्यंत तळमळीने लिहीलेल्या या दोन पुस्तकांनंतर देशाचे भविष्य घडवणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे हे तिसरे पुस्तक वाचकांना नक्की आवडेल. आपल्याकडून येणाऱ्या प्रतिसादांच्या आधारे त्या अत्यंत मेहनतीने आपल्या लेखनाचा कस वाढवत नेत आहेत. लवकरच त्यांची गणना मराठीतील प्रमुख लेखिकांमध्ये होईल असा आम्हाला विश्वास आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

ई साहित्य प्रतिष्ठान

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे  असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान